# प्रा. किरण शहापूरकर यांना पीएच डी. पदवी –



**पन्हाळा :** पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक चेअरमन पी. आर. भोसले सर आणि सहसचिव एन. आर. भोसले सर यांनी सर्वसामान्य व गरीब मुलांच्या शिक्षणासाठी संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. विद्यार्थी फक्त शिकला पाहिजे यासाठी नव्हे तर तो चांगल्या पद्धतीने शिकला पाहिजे यासाठी संस्थेने आय. आय. टी. व एन. आय. टी. सारख्या इंन्सीट्युट मधून तीन चांगल्या व डॉक्टरेट प्राध्यापकांची नेमणूक केलेली आहे. त्यापैकीच मेकॅनिकल विभागात कार्यरत असणारे सहाय्यक प्राध्यापक किरण हनमंत शहापूरकर (रा. बेळगाव) यांना नॅशनल इंन्सीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कर्नाटक, सुरतकल या विद्यापिठाची मेकॅनिकल या विषयातील पीएच. डी. पदवी जाहीर झाली. त्यांनी प्रा. डॉ.

मृत्यू ंजय दोडमनी आणि प्रा. डॉ. जी. सी. मोहनकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली “Experimental Investigation of Cenosphere Epoxy Syntactic Foam Composites” या विषयावर सदरच्या विद्यापिठात प्रबंध सादर केला होता. त्यांना विद्यापिठाकडून सदरच्या विषयाची पीएच. डी. पदवी प्रधान करण्यात आली. प्रा किरण शहापूरकर यांना रिसर्च क्षेत्रातील ३ वर्षाचा अनुभव असून आत्तापर्यंत आंतरराष्ट्रीय स्थरावर त्यांचे एकूण १३ रिसर्च पेपर पब्लिश झालेले आहेत. त्यांना संजीवन शिक्षण समूहाचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले, कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी, प्रा. डॉ. सिद्दाप्पा बेकीणाळ, विभाग प्रमुख प्रा. विनायक देवकर यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

**फोटो ओळ :**

**पन्हाळा :** पीएच डी. पदवी मिल्याल्याबाद्द्ल प्रा. किरण शहापूरकर यांचे अभिनंदन करताना पी. आर. भोसले, एन. आर. भोसले, प्राचार्य डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. सिद्दाप्पा बेकीणाळ.

**फोटो :** प्रा. किरण शहापूरकर

- **संग्राम पाटील, सहाय्यक ग्रंथपाल, सेटी, पन्हाळा**